## ●भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्काराचे थाटात वितरण

# ‘माणसांनी स्व:ताचे सुप्त गुण ओळखावेत’

**सोलापूर (प्रतिनिधी)**

प्रत्येक माणसामध्ये एक सुप्त गुण असतो. तो त्याने ओळखण्याची गरज असते. त्या गुणाच्या जोरावर सामान्यातला सामान्य माणूसही यशाच्या शिखरावर पोहचू शकतो, असे प्रतिपादन मध्य रेल्वेचे वरिष्ठ मंडल परिचालक सुशील गायकवाड यांनी केले.




**भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्कार वितरणाप्रसंगी सुशील गायकवाड, डॉ. रणजित गांधी, प्रा. शंकर साळुंखे, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पंडीत आदी .**

स्व. हिरालाल ऊर्फ भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून श्री. ऐ. प. दि. जैन पाठशाला सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे दिल्या जाणाऱ्या भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्काराचे वितरण रविवारी करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्रा. शंकर साळुंखे, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पंडीत आदी उपस्थित होते. यंदाच्या वर्षी डॉ. कोथूर रायर्वेद्र राव, प्रा. अनिल अंकुलकर, प्रा. प्रशांत माणिकशेटे आणि दीपक कलढोणे यांना शिक्षक सेवा पुरस्काराने, तर बलराजसिंह बायस आणि शीतल जमगे यांना शिक्षकेतर सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सहा विभागातून दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप सन्माचिन्ह, सन्मानपत्र आणि पाच हजार रुपये असे आहे. या प्रसंगी जिर्तेंद्र कांगो, वरुण पुजारी, सुभम मोहोळकर, जयराज गोसावी, मेघना कुलशेट्टी, अक्षय अघाशे, नेहा देशमाने, मनीषा जुनवणे, दर्शन पंडित, वैभवी टाके, ऋषभकुमार शहा, जयश्री माने, अनुराधा बंडगर, अनुज पवार आणि शीतल पटणे आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

वालचंदचा माजी विद्यार्थी बळवंत जोशी यांने स्वागतगीत म्हटले. डॉ. प्रा. भीमाशंकर बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. प्रा. सतीश काशीद आणि प्रा. मनीषा निरगुडे यांनी केले. आभार प्रा. एस. एन. बत्तीन यांनी मानले. प्राचार्य डॉ. अजित माणिकशेटे, पृथ्वीराज गांधी, विक्रम गांधी, वैभव गांधी, ब्रिजेश गांधी, भूषण शहा, पराग शहा आदी उपस्थित होते.